जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये गुणवत्तेत अग्रेसर



- 'नॅक' पुनर्मूल्यांकन समितीकडून निकाल जाहीर
- बहुतांश महाविद्यालयांना 'अ' मानांकन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय मूल्यांकन परिषद (नॅक) बेंगलोरच्या समितीने महाविद्यालयांचा पुनमूर्ल्यांकनाचा निकाल जाहीर केला असून शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील बहुतांश महाविद्यालये 'अ' मानांकन मिळवीत गुणवत्तेत अग्रेसर राहिली आहेत.

'नॅक'तर्फे देशभरातील महाविद्यालये, विद्यापीठाचे मूल्यांकन केले जाते. १ ते ४ फेरीच्या पुनर्मूल्यांकन निकाल यादी समितीने सोमवारी जाहीर केली. पहिल्या फेरीत (फर्स्ट सायकल) आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खानापूर जि. सांगली (ब), भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मोरेवाडी-कोल्हापूर (अ), डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कसबा बावडा (अ), श्री अंबाबाई तालीम संस्था संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मिरज (अ) यांचा समावेश आहे. दुसऱ्या फेरीत (सेकंड सायकल) ११५ महाविद्यालयांची यादी जाहीर करण्यात आली. यात आ. शशिकांत शिंदे महाविद्यालय मेढा, सातारा (बी प्लस), डेक्कन एज्युकेशन सोसायटी विलिंग्डन कॉलेज (अ), लोकनेते हणमंतराव चॅरिटेबल ट्रस्ट आदर्श कॉलेज विटा, सांगली (बी प्लस) यांनी मूल्यांकनात यश संपादन केले आहे.

तिसऱ्या फेरीत (थर्ड सायकल) देशभरातील ११६ महाविद्यालयांची यादी जाहीर केली असून यात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १२ महाविद्यालयांचा समावेश आहे. भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई कदम कडेगाव, सांगली (अ), दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज हातकणंगले, कोल्हापूर (अ), कमला कॉलेज राजारामपुरी, कोल्हापूर (अ), महावीर महाविद्यालय कोल्हापूर (अ), रयत शिक्षण संस्थेचे डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव, सातारा (अ), छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा (अ प्लस), राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर (अ), सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा (बी प्लस, प्लस), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय पाचवड, सातारा (बी प्लस प्लस), व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी (ब), यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड, सातारा (बी प्लस प्लस), काकासाहेब चव्हाण महाविद्यालय तळमावले पाटण, सातारा (बी प्लस) श्रेणी मिळविली आहे.

> शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांची गुणवत्ता वाढत आहे. विद्यापीठाने यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. नॅक मूल्यांकनात महाविद्यालयांनी गुणवत्ता सिद्ध केली असून हा महाविद्यालयांचा सन्मान आहे.
>
> – डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2017
लोकमत

# प्रशासकीय अभियानांतर्गत विद्यापीठात पाहणी सुरु

## उत्कृष्ट विभागाचा होणार पुरस्काराने सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध विभागांतील गुणवत्तावाढीला बळ देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठामध्ये गेल्या तीन वर्षांपासून 'प्रशासकीय गुणवत्ता अभियान' राबविले जात आहे. यंदाच्या अभियानाची सुरुवात सोमवारपासून झाली.

या अभियानांतर्गत विद्यापीठातील प्रशासकीय, शैक्षणिक अशा सुमारे ५० विभागांची पाहणी केली जाणार आहे. यात कार्यालयीन दप्तर निकषाअंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आदींचा तपशील, कामकाजाची माहिती, कागदपत्रांचे व्यवस्थापन, दैनंदिन कामकाज, विभागामध्ये राबविण्यात आलेले नावीन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थ्यांचे सर्वसाधारण रजिस्टर, आदींची पाहणी या अभियानासाठी नियुक्त केलेल्या समितीतर्फे करण्यात येणार आहे. या निकषांनुसार पाहणीनंतर संबंधित विभागांना गुण दिले जाणार आहेत. या अभियानाअंतर्गत दि. ७ नोव्हेंबरला पाहणी होणार आहे. यातून उत्कृष्ट विभागाला पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. या पुरस्काराचे वितरण दि. १८ नोव्हेंबरला होणाऱ्या विद्यापीठाच्या वर्धापनदिनी होईल. दरम्यान, या अभियानाची पाहणी सुरु झाल्याने विद्यापीठातील विविध विभागांमध्ये तयारीची लगबग सुरु झाली आहे. काही विभागांनी यासाठी स्वतंत्र समिती तयार करून काम सुरु केले आहे. तीन वर्षांपूर्वी हे अभियान 'स्वच्छता अभियान' म्हणून राबविण्यात येत होते. गेल्या तीन वर्षांपासून त्याचे नामकरण 'प्रशासकीय गुणवत्ता अभियान' असे करण्यात आले आहे.

3 1 OCT 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### शिवाजी विद्यापीठ : आज अखेरची मुदत; १७ नोव्हेंबरला मतदान

# अधिकार मंडळासाठी शक्तिप्रदर्शनाने अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीतील उमेदवारी अर्ज काही संघटनांकडून सोमवारी शक्तिप्रदर्शनाने दाखल करण्यात आले. अन्य संघटनांची अर्ज भरण्याची, आवश्यक कागदपत्रांच्या पूर्तता करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी धावपळ सुरु होती. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची आज, मंगळवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत मुदत आहे.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, अभ्यास मंडळे आदी अधिकार मंडळांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. यासाठी दि. १७ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. सोमवारपर्यंत ११५८ अर्जांची विक्री झाली असून, विविध गटांतर्गत २६१ अर्ज दाखल झाले. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने अभ्यास मंडळे-विभागप्रमुख आणि विद्या परिषद-शिक्षक गटामधील उमेदवारी अर्ज भरले. यातील विवेकानंद शिक्षण संस्था आणि रयत शिक्षण संस्थेने त्यांच्या उमेदवारांचे अर्ज एकत्रितपणे दाखल केले. पदवीधर, प्राचार्य आणि संस्थाचालक गटातील उमेदवारांनी आपआपल्या वेळेनुसार गटागटाने येऊन अर्ज भरले. शिवाजी विद्यापीठ आजी-माजी कृती समितीने विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन करून नोंदणीकृत पदवीधर गटातील नऊ अर्ज शक्तिप्रदर्शनाने दाखल केले. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुरेश कुऱ्हाडे, राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेचे सागर नलवडे, मनसे विद्यार्थी संघटनेचे मंदार पाटील, यूएसएचे अमोल महापुरे, छावा मराठा संघटनेचे अनिल माने, कृती समितीचे चांगदेव बंडगर, युवक काँग्रेसचे सम्राट शिंदे, मराठा क्रांती मोर्चाचे मधुकर पाटील, रामराजे माने, प्रियांका धनवडे, विश्वास माने, विकास मस्के, महेश बनसोडे उपस्थित होते. अर्ज दाखल करण्यास आलेल्या संघटनांनी शक्तिप्रदर्शन केले.

### गटनिहाय दाखल झालेले अर्ज



- प्राचार्य : २७
- व्यवस्थापन प्रतिनिधी व शिक्षक : प्रत्येकी १४
- विद्यापीठ शिक्षक : ४
- नोंदणीकृत पदवीधर : ८२
- विद्या परिषद शिक्षक : ७
- अभ्यास मंडळे-विभागप्रमुख : ११३

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2017
सकाळ



# अधिसभा निवडणुकीसाठी 'पदवीधर'मधून नऊ अर्ज

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी पदवीधर गटातून शिवाजी विद्यापीठ आजी-माजी समितीतर्फे शक्तिप्रदर्शन करीत नऊ अर्ज दाखल करण्यात आले. कृती समितीचे निमंत्रक डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे अॅड. सुरेश कुऱ्हाडे, राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेचे सागर नलवडे, मनसे विद्यार्थी संघटनेचे मंदार पाटील, 'यूएसए'चे अमोल महापुरे, छावा मराठा संघटनेचे अनिल माने, कृती समितीचे चांगदेव बंडगर, युवक काँग्रेसचे सम्राट शिंदे, मराठा क्रांती मोर्चाचे मधुकर पाटील, रामराजे माने, प्रियांका धनवडे, विश्वास माने, विकास मस्के, महेश बनसोडे आदींसह आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे सर्व सदस्य, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# सिनेट निवडणुकीसाठी शक्तिप्रदर्शनाने ११५८ अर्ज

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी इच्छुकांची धावाधाव सुरू झाली असून व्यक्तिगत भेटीगाठी आणि संपर्क यंत्रणा सक्षम करण्यासाठी इच्छुकांना पायाला भिंगरी बांधली आहे. मंगळवारी अर्ज भरण्याचा अखेरचा दिवशी शक्तिप्रदर्शन करत ११५८ अर्ज दाखल झाले आहेत.

अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी आणि दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निवडण्यात येणार आहेत. त्यानुसार अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळासाठी १७ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघारीची मुदत आहे.

अभ्यासमंडळ गटातून सर्वाधिक ११३ अर्जांची विक्री झाली आहे. तर प्राचार्य गटातून २७, व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून १४, शिक्षक गटातून १४, विद्यापीठ शिक्षक गटातून ४, नोंदणीकृत पदवीधर गटातून ८२ तर विद्यापरिषद गटातून ७ इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत.

**जोरदार शक्तिप्रदर्शन**

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने जोरदार शक्तिप्रदर्शन करत अधिसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल केले. विद्यापीठ अधिसभेसाठी पदवीधर गटातून शिवाजी विद्यापीठ, आजी-माजी कृती समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून अर्ज दाखल केले. डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्या नेतृत्वाखाली नऊ अर्ज दाखल केले. यावेळी काँग्रेसचे नेते अॅड. सुरेश कुऱ्हाडे, राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेचे सागर नलवडे, मनसे विद्यार्थी संघटनेचे मंदार पाटील, यूएसएचे अमोल महापुरे, छावा मराठा संघटनेचे अनिल माने, कृती समितीचे चांगदेव बंडगर, युवक काँग्रेसचे सम्राट शिंदे, मराठा क्रांती मोर्चात सक्रीय असलेले मधुकर पाटील, रामराजे माने, प्रियांका धनवडे, विश्वास माने, विकास मस्के, महेश बनसोडे यांच्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर येथील आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे सर्व सदस्य, विद्यार्थी व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2017
पुढारी

# विद्यापीठ निवडणुकीसाठी २६१ अर्ज दाखल

**कोल्हापूर / प्रतिनिधी** : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसह अन्य अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी शुक्रवारपर्यंत विविध गटांतून २६१ अर्ज दाखल झाले. सोमवारपर्यंत विविध गटांसाठी सोमवारपर्यंत एकूण ११५८ अर्जांची विक्री झाली आहे. मंगळवार, ३१ रोजी अर्ज विक्रीचा शेवटचा दिवस आहे. यामध्ये प्राचार्य गटातून २७, व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून १४, शिक्षक गटातून १४, नोंदणीकृत पदवीधरमधून ८२, अभ्यास मंडळे-विभागप्रमुख गटातून ११३ आणि विद्या परिषद-शिक्षक गटासाठी ७ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2017
पुढारी

# उमेदवारी अर्ज भरण्याचा आज अखेरचा दिवस



**शिवाजी विद्यापीठ निवडणूक**

- आजअखेर २६१ अर्ज दाखल
- अनेकांनी केले शक्तिप्रदर्शन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा मंगळवार अखेरचा दिवस असल्याने गर्दी होणार आहे. दरम्यान, आजअखेर विविध गटांत एकूण २६१ अर्ज दाखल झाले आहेत. सर्वात जास्त ११३ अर्ज अभ्यासमंडळे-विभागप्रमुख व त्याखालोखाल नोंदणीकृत पदवीधर गटासाठी ८२ अर्ज दाखल झाले. आज अनेक उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत अर्ज दाखल केले.

अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आता वेग आला आहे. या निवडणुका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार घेण्यात येणार आहेत. आज सकाळी अकरापासून अनेकांनी आपल्या समर्थकांसह शक्तिप्रदर्शन करत अर्ज भरले. कोल्हापूर, सांगली व सातारा असे तीन जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या या निवडणुकीसाठी पडद्यामागे हालचालींना वेग आला आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघारीची मुदत असणार आहे. अर्ज माघारीनंतर थेट चित्र स्पष्ट होईल.

## विभागवार अर्ज असे

प्राचार्य – २७, व्यवस्थापन प्रतिनिधी – १४, शिक्षक– १४, विद्यापीठ शिक्षक – ४, नोंदणीकृत पदवीधर – ८२, विद्या परिषद –शिक्षक – ७, अभ्यासमंडळे – विभागप्रमुख – ११३.

## मोठ्या संख्येने अर्ज भरले

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीकडून अभ्यासमंडळे–विभागप्रमुख आणि विद्या परिषद शिक्षक गटामधील उमेदवारी अर्ज भरण्यात आले. यातील विवेकानंद शिक्षण संस्था आणि रयत शिक्षण संस्थेने त्यांच्या उमेदवारांचे अर्ज एकत्रितपणे विद्यापीठात दाखल केले. पदवीधर, प्राचार्य आणि संस्थाचालक गटातील उमेदवारांनी आपापल्या वेळेनुसार गटा–गटाने येऊन आज मोठ्या संख्येने अर्ज भरले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2017
सकाळ

# अधिसभेसाठी अर्जाचा आज अखेरचा दिवस



कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस मंगळवार (ता. ३१) आहे. सायंकाळी पाचपर्यंत अर्ज दाखल करता येणार असून, गर्दी होणार आहे. आजही अनेक उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करीत अर्ज दाखल केले. दरम्यान, आजअखेर विविध गटांत २६१ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. सर्वांत जास्त ११३ अर्ज अभ्यासमंडळे-विभागप्रमुख व त्या खालोखाल नोंदणीकृत पदवीधर गटासाठी ८२ अर्ज दाखल झाले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी शेवटच्या दोन दिवसांत उमेदवारी अर्जांसाठी धांदल उडाली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार या निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. आज सकाळपासून ११ जणांनी अर्ज भरले. कोल्हापूरसह सांगली व सातारा असे कार्यक्षेत्र असून, ४ नोव्हेंबरपर्यंत माघारीची मुदत असेल. त्यानंतरच पुढचे चित्र स्पष्ट होईल. प्राचार्य विभागातून २७, व्यवस्थापन प्रतिनिधी विभागातून १४, शिक्षक विभागातून १४, नोंदणीकृत पदवीधर विभागातून ८२, विद्या परिषद शिक्षक विभागातून सात, तर अभ्यासमंडळे विभागप्रमुख विभागातून ११३ जणांनी आजवर अर्ज दाखल केले आहेत.

31 OCT 2017 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK among 32 institutes shortlisted for IOE

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has been shortlisted for Union government's proposed ambitious project of setting up world class Institution of Eminence (IOE).

A university officials said as many as 32 institutes across the country have been shortlisted and from Maharashtra only two varsities have been selected — SUK and Pune-based Savitribai Phule Pune University (SPPU).

Confirming the news, SUK pro-VC D T Shirke said they received an email from the ministry of human resource development (MHRD) earlier in the third week of October about the SUK being shortlisted for the proposed project.

"A video-conferencing was also conducted with the MHRD secretary and the University Grants Commission (UGC) chairman on October 25 earlier this month, wherein the shortlisted institutes were given orientation of the IOE and how to proceed," he said.

Shirke added that for shortlisting, the MHRD considered the varsity's National Institutional Ranking Framework (NIRF) ranking and overall performance in past two years.

"We are delighted and honoured to feature among the shortlisted institutes that involve many big national level players. Now, we are preparing for the IOE application for which a strategic plan has to be created. For this, we have already formed a few committees to look after the academic and administrative details," he said, adding that the final proposal will have to be submitted by December this year.

According to Shirke, as the project is for creating top-notch institution, the processing fee for it is also matches its rank. "An institute has to pay Rs 1 crore processing fee with the IOE proposal. If the institute does not get selected, it will get Rs 75 lakh back and not the whole amount," he said.

Earlier, on expectations from an institution of eminence, the UGC circular had said that it should preferably be multi-disciplinary and have both teaching and research focus of an exceptionally high quality.

"Apart from regular courses, it should also offer various inter-disciplinary courses, including in areas of emerging technology and interest as well as those of relevance to the development concerns of the country. It should also have a good proportion of foreign or foreign quality faculty," it said.

Most important point of the expectations in the guidelines suggested that it should come in top 500 of any of the world renowned ranking frameworks in the first 10 years of setting up on being declared as Institution of Eminence. Furthermore, it should consistently improve its ranking to come in the top 100 eventually over time.

On the financial assistance it added that the assistance would be up to an amount of Rs 1,000 crore or 50 to 75% of the requirement projected in the perspective and detailed plans in a span of five years.

File Photo



From Maharashtra only two universities have been selected — SUK and Pune-based Savitribai Phule Pune University

## About IOE

- The objective of IOE is to provide for greater academic, financial, administrative and other regulatory autonomy to 10 public and 10 private higher educational institutions to emerge as world teaching and research institutions
- A preliminary orientation with both-public and private institutions has been conducted by the MHRD
- If selected, an institute would get the assistance up to an amount of Rs 1,000 crore in a span of five years